SHRI GULABRAO ESHWARA KHANDVE EDUCATIONAL FOUNDATION,

# JAGADGURU INTERNATIONAL SCHOOL, LOHEGAON, PUNE

**TERM 1 EXAM (2024-25)**

**Class: VIII** **Section: A** **Subject: Marathi**

**Date: 26/ 09/2024** **Total Marks: 80**

**Roll No. : ____** **Time: 3 Hours**

**General Instructions :**

i) **The Question Paper consists of Two sections- Reading and Comprehension Literature based questions and Grammar**

ii) **All questions are compulsory.**

iii) **Read the question carefully before attempting it.**

## विभाग अ - गुण ४०

**प्रश्न १अ ) खालील उतारा वाचा व त्याआधारे विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा .** ( कोणतेही ५) **गुण ५**

रमाबाई रानडेंचा जन्म २५ जानेवारी इ.स. १८६२ रोजी एका लहानशा खेड्यात झाला. रमाबाईंना माहेरी असताना अक्षर ओळख झाली नव्हती. वयाच्या ११व्या वर्षी त्यांचा महादेव गोविंद रानडे यांच्याशी विवाह झाला. स्त्री शिक्षण हे त्या काळात सामाजिकदृष्ट्या वर्ज्य गोष्ट होती. महादेव रानडे हे सामाजिक चळवळ आणि नवविचारी मतवादाचे खंदे पुरस्कर्ते होते. घरच्यांच्या आणि समाजाच्या विरोधाला झुगारून महादेव रानडे यांनी आपल्या पत्नीस शिक्षित केले. रमाबाईंनी उत्तम गृहिणी होत्या . त्यानी आपल्या पतीच्या सामाजिक कार्यात मदत करून मोलाची भर घातली. स्त्रियांना समान अधिकारांसोबतच शिक्षणाचा अधिकारही समाजाने नाकारला होता. लग्नानंतर रमाबाईंच्या शिक्षणाची सुरुवात झाली. रमाबाईंनी मराठी, हिंदी आणि बंगाली या भाषांमध्ये विशेष प्रावीण्य संपादन केले. रमाबाईंनी सर्वप्रथम जाहीर भाषण नाशिक हायस्कूलमध्ये एका कार्यक्रमात केले. रमाबाईंनी मराठी आणि इंग्रजी भाषेवर प्रभुत्व मिळवले होते. त्यांची भाषणे ही अत्यंत साध्या भाषेतली, श्रोत्यांच्या मनाला भिडणारी असत. त्यांनी मुंबई मध्ये आर्य महिला समाजाची स्थापना केली. इ.स. १८९३ ते इ.स. १९०१ या काळात त्यांच्या सामाजिक कर्तृत्वाचा आलेख हा सतत उंचवणारा होता. त्यांनी हिंदू लेडीज सोशल आणि लिटररी क्लबची मुंबईत स्थापना केली, तसेच महिलांना भाषा, सामान्य ज्ञान, शिवणकाम आणि हस्तकला यांचे प्रशिक्षण वर्ग सुरू केले. पुण्यातील आपल्या वडिलोपार्जित वाड्यातून सुरू केलेले सेवा सदन हे उत्तरोत्तर वाढतच गेले. रमाबाईंनी जागतिक युद्ध परिषदेत भारतीय महिलांचे प्रतिनिधित्व केले. त्यांनी फिजी आणि केन्या मधील भारतीय मजुरांच्या समस्यांवर देखील आवाज उठवला.

i ) वयाच्या ११व्या वर्षी रमाबाई यांचा विवाह कोणाशी झाला ?
ii ) महादेव रानडे हे कशाचे खंदे पुरस्कर्ते होते ?
iii ) रमाबाईंनी सर्वप्रथम जाहीर भाषण कोठे केले ?
iv ) रमाबाई यांनी कोणत्या क्लबची मुंबईत स्थापना केली ?
v ) रमाबाई यांनी दुसऱ्या कोण -कोण देशातील भारतीय मजुरांच्या समस्यांवर देखील आवाज उठवला?
vi ) रमाबाईंनी कोणत्या भाषांमध्ये विशेष प्रावीण्य संपादन केले होते ?

**<u>ब ) खालील उतारा वाचा व त्याआधारे विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा .</u>** गुण -५

नारळीकरांचा जन्म कोल्हापूर येथे जुलै १९, १९३८ रोजी झाला. त्यांचे वडील, विष्णू वासुदेव नारळीकर हे एक प्रसिद्ध गणितज्ञहोते . वाराणसी येथील बनारस हिंदू विद्यापीठाच्या गणित शाखेचे प्रमुख होते. त्यांची आई सुमती विष्णू नारळीकर ह्या संस्कृत शिक्षिका होत्या. जयंत नारळीकरांचे शालेय शिक्षण वाराणसी येथे झाले. इ.स. १९५७ साली त्यांनी विज्ञानात पदवी (B.Sc.) प्राप्त केली.या परीक्षेत त्यांनी प्रथम क्रमांक पटकावला. त्यानंतर उच्च शिक्षणासाठी ते ब्रिटनमधील केंब्रिज येथे गेले. तेथे त्यांना बीए, एमए व पीएचडीच्या पदव्या मिळाल्या. शिवाय, रँग्लर ही पदवी, खगोलशास्त्राचे टायसन मेडल, स्मिथ पुरस्कार व इतर अनेक बक्षिसे मिळाली.त्यांनी मुंबई येथील टाटा मूलभूत संशोधन संस्थेच्या (टी.आय.एफ.आर.) खगोलशास्त्र विभागात प्रमुख म्हणून पद स्वीकारले. १९८८ साली त्यांची पुणे येथील आयुका संस्थेचे संचालक म्हणून नियुक्ती झाली.डॉ. जयंत नारळीकर यांनी सर फ्रेड हॉएल यांच्यासोबत 'कन्फॉर्मल ग्रॅव्हिटी थिअरी' मांडली.चार दशकाहून अधिक कालावधीपासून त्यांचे खगोलभौतिकी क्षेत्रात संशोधन सुरू आहे. त्याच बरोबर सतत पुस्तके लिहिण्याचा कार्यक्रमही चालू आहे. सामान्य माणसाला खगोलशास्त्र समजवण्यासाठी त्यांनी गेली अनेक वर्षे प्रयत्न केले आहेत. यासाठी सर्व प्रसारमाध्यमांचा ते उपयोग करतात. त्यांच्या 'यशाची देणगी' या पहिल्याच पुस्तकाला महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार मिळाला आहे.

i) जयंत नारळीकर हे वाराणसी येथील बनारस हिंदू विद्यापीठाच्या कोणत्या शाखेचे प्रमुख होते **?**
ii) जयंत नारळीकर यांनी ब्रिटन मधील केंब्रिज येथे कोणत्या पदव्या मिळवल्या **?**
iii) जयंत नारळीकर यांनी मुंबईमधील कोणत्या संशोधन संस्थेच्या विभागात प्रमुख म्हणून पद स्वीकारले **?**
iv) नारळीकर यांच्या कोणत्या पुस्तकाला महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार मिळाला**?**
v) नारळीकर यांचा जन्म कधी व कोठे झाला **?**

**<u>व्याकरण -गुण २०</u>**

**<u>प्रश्न २. अ ) खालील वाक्यातील अधोरेखित शब्दांच्या जाती ओळखा.</u> ( कोणतेही ४)** गुण ४
i) <u>होय तर !</u> कष्ट करावेच लागतात.
ii) मी तिच्या <u>पाठीवर</u> हात ठेवते.
iii) नापास <u>झाल्यानंतर</u> त्याला कळले, अभ्यास करायला हवा होता.
iv) पोटोबा लठ्ठ असले <u>म्हणून</u> भिण्याचे कारण नाही.
v) मंदिरा<u>समोरच</u> तलाव आहे.

**ब) सूचनेनुसार कृती करा.** गुण ४
i) शेतात मी खूप धन पुरून ठेवले आहे. ( वाक्यातील सर्वनाम ओळखा)
ii) मंद वाऱ्या सुटला आहे. ( वाक्यातील विशेषण ओळखा)
iii) साहेब माझा ऐकून घेतात . ( वाक्यातील क्रियापद ओळखा)
iv) झाडाला फळ आपोआप लागते. ( वाक्यातली क्रियाविशेषण ओळखा)

**क) वाक्यप्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा. ( कोणतेही २)** गुण ४
i) विल्हेवाट लावणे -
ii) विस्थापित होणे -
iii) नवचैतन्य पसरणे-

**प्रश्न ३. अ) समानार्थी शब्द लिहा. ( कोणतेही २)** गुण २
i) वस्ती - ii) सोने- iii) तुळस

**ब) विरुद्धार्थी शब्द लिहा.( कोणतेही २)** गुण २

i) आळशी x ii) कृत्रिम x iii) अखंड x

**क) लिंग बदला व लिहा.( कोणतेही २)** गुण २

i) वीर- ii) मालक - iii) नायक -

**ड) वचन बदला व लिहा.( कोणतेही २)** गुण २

i) पायरी- ii) दिवा - iii) विद्यालय-

**प्रश्न ४. अ ) खालील उतारा वाचा व त्याआधारे विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा .** गुण ५

1974 पासून महाराष्ट्र शासनाच्या लघुउद्योग विकास मंडळाने या पैठणी उद्योगाचा पुनर्विकास सुरू केला .पैठण व येवला या दोन्ही ठिकाणच्या विनकरांना उत्तेजन देऊन पैठणी निर्मितीचे काम जोमाने सुरू केले. . महाराष्ट्रातील पैठणी उत्पादनात येवल्याचा सुमारे 80 टक्के वाटा आहे. पूर्वी पैठणी निर्मितीचा खर्च खूप होता. परंतु आता कृत्रिम धागे, कृत्रिम जर आणि यंत्रावरील उत्पादन यामुळे पैठणी सामान्य ग्राहकांच्या अवाक्यातआली आहे. पैठणीचे मुख्य आकर्षण असते ते म्हणजे तिचा पदर व जर तारी काठ. बांगडी, मोर, पोपट, मैना , अजिंठा, कमळ, कुयरी, आ क्रोटी असे नक्षीकाम त्यावर असते. आधुनिक काळात तरुण वर्गात पैठणी ची फॅशन प्रसिद्ध होत आहे. जसे कुर्ती, जॅकेट, पर्स, वन पीस आणि इतर वस्तू पैठणी डिझाईन मध्ये बनवल्या जात आहेत. सन 2000 मध्ये तर ब्रिटिश एअर वेजने त्यांच्या विमानाचा बाहेरचा भाग पैठणीच्या नक्षीने सजवला होता. अशा रीतीने या पारंपरिक कलेला नव्याने उभारी मिळत आहे. मूळ जरतारी पैठणीचा रुबाब टिकवण्यासाठी व हातमागावर पैठणी विणणाऱ्या विणकारांसाठी विशेष प्रयत्न करून ही पैठणीची कला टिकवणे गरजेचे आहे.

i) महाराष्ट्रातील पैठणी उत्पादनात येवल्याचा सुमारे किती टक्के वाटा आहे?
ii) कोणत्या कारणामुळे पैठणी सामान्य ग्राहकांच्या आवाक्यात आली आहे?
iii) सन2000 मध्ये ब्रिटिश एअरवेज ने त्यांच्या विमानाचा बाहेरचा भाग कसा सजवला होता ?
iv) पैठणीचे मुख्य आकर्षण कशात असते ?
v) आधुनिक काळात तरुण वर्गात पैठणी ची फॅशन म्हणून ती कोणत्या डिझाईन मध्ये बनवली जाते ?

**ब ) खालील कविता वाचा व त्याआधारे विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा .** गुण ५

एक पणती मिणमिणती
उजळून टाकते अंधाऱ्या राती ॥
मंदिरात झुलतो लामण दिवा
म्हणतो सर्वांना सुखी ठेवा ॥
समईत घालून तेल आणि वात
दीप उजळतो देवघरात॥
फुलवात घालून तुपांचे निरांजन
मुलाबाळांचे करूया औक्षण॥
संध्याकाळी दिवा तुळशीपाशी
आरोग्य मागू या घरादाराशी ॥
चिमणी कंदील रॉकेलचा दिवा
गरिबांच्या झोपडीतही उजेड हवा ॥

i) मंदिरात काय झुलतो ?
ii) संध्याकाळी कोठे दिवा लावला जातो ?
iii) गरिबांच्या झोपडीत कोण उजेड देतो ?
iv) औक्षण कोणाचे करूयात असे कवी म्हणतो ?
v) " दीप " शब्दाचा समानार्थी शब्द लिहा.

**विभाग ब - गुण ४०**

**साहित्य गद्य**

**प्रश्न ५अ ) एका वाक्यात उत्तरे लिहा . ( कोणतेही ४ )** गुण ४
i) दर आठवड्याला कोणाची शाळा भरते ?
ii) कोणत्या पैठणीला आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत मानाचे स्थान आहे ?
iii) महात्मा गांधीजीं स्वच्छते संदर्भात काय म्हणत असत ?
iv) दादासाहेबांचे पूर्ण नाव काय होते ?
v) पोपटाला कशाची सवय झाली होती ?

**ब) रिकाम्या जागा भरा.** गुण ४
i) स्वच्छ भारत अभियानास—-------- पासून सुरुवात झाली.
( 2 ऑक्टोबर 2014 / 15 ऑगस्ट 2014 / 26 जानेवारी 2014 )
ii) —------ दादासाहेब फाळके यांनी —-------- संस्थेत नोकरी केली .
( भारतीय पुरातत्व सर्वेक्षण / भारतीय ऐतिहासिक सर्वेक्षण / भारतीय चित्रपट सर्वेक्षण )
iii) गावच्या—-------- हस्ते ध्वजारोहण झाले.
( पंचांच्या / सरपंचांच्या / मुखियाच्या )
iv) पारध्याने पोपटाला—---------- बाजारात नेऊन विकले.
( दैनंदिन / आठवडे / मुंबईच्या )

**क) थोडक्यात उत्तरे लिहा. ( कोणतेही १ )** गुण ३
i) स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव कशाप्रकारे साजरा झाला ?
ii) पैठणीचा इतिहास थोडक्यात लिहा.
iii) आपण स्वच्छ भारत अभियानाला कशाप्रकारे हातभार लावू शकतो?

**पद्य**

**प्रश्न ६ अ ) एका वाक्यात उत्तरे लिहा . ( कोणतेही ४ )** गुण ४
i) दीप पूजन कधी करतात ?
ii) संत नामदेवांची काय इच्छा आहे?
iii) प्रियजनांचे स्मरण कशा प्रकारे करतात ?
iv) कोणकोणत्या प्रसंगी दीप लावला जातो ?
v) संत नामदेव महाराज देवाकडे काय प्रार्थना करतात ?

**ब) रिकाम्या जागा भरा.** गुण २
i) सीमेवरती सैनिक लढती , त्यांच्यासाठी लावूया अखंड —-----
( वात / दिवा / ज्योती )
ii) धेनु चरे —---- वच्छ असे घरी .
( जंगलात / वनी / डोंगरात )

**क) थोडक्यात उत्तरे लिहा. ( कोणतेही १ )** गुण ३
i) " दीप पूजन " या कवितेत संकटावर मात कशाप्रकारे करायची आहे असे कवी म्हणतो ?
ii) संत नामदेवांनी त्यांच्या अभंगात पक्षिणी आणि धेनु या उदाहरणातून काय सुचित केले आहेत ?

**<u>प्रश्न ७.अ) खालील पैकी कोणत्याही एका विषयावर सुमारे २००-२५० शब्दात निबंध लिहा .</u>** **गुण ८**

* माझी आवडती सहल - ( सहलीचे ठिकाण - कशी तयारी केली - किती वेळ लागला - प्रेक्षणीय स्थळे - सहभागी कोण कोण - गंमत मौज मस्ती - अविस्मरणीय प्रसंग - आठवण

**<u>किंवा</u>**

* पाऊस संपावर गेला तर ( पावसा चे आगमन - सर्वत्र आनंद - पावसाची सतत धार - कामकाज ठप्प - पावसाला बरे वाईट बोलणे - पावसाला राग येणे - पाऊस संपावर जाणे - नदी नाले कोरडे पडणे - पशुपक्षी मानव काळजी त - पावसाला विनवणी - पावसाचे महत्व पटणे )

**ब) दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे कथा लिहा . कथेला शीर्षक द्या व तात्पर्य लिहा .** **गुण ७**

*व्यापाराच्या घरी समारंभ - मुलीच्या अंगावर दागिने - मुलीच्या अंगठी चोरीस गेली - घर नोकरांवर संशय- सगळीकडे शोधणे पण अंगठी न सापडणे - प्रकरण कोर्टामध्ये जाणे - न्यायाधीशाची युक्ती लढवणे - सर्व नोकऱ्यांना काठ्या - ज्या चोराकडे अंगठी त्या चोराचीच काठी वाढेल - खरा चोर घाबरणे - अंगठी परत करणे

**<u>किंवा</u>**

*एक सैनिक - पराक्रमी , देशप्रेमी - शत्रु कडून पकडला जाणे - तुरुंगात टाकणे -हाल करणे - सुटका होणे - येताना वाटेत पक्षी विकणारा दिसणे - सगळे पक्षी खरेदी - सोडून देणे - सर्वांना आश्चर्य वाटणे - स्वतःची ओळख करून देणे - स्वातंत्र्याचे मूल समजावणे - तात्पर्य

**क) खालील विषयावर पत्र लिहा. ( लिफाफा आवश्यक )** **गुण ५**

* एक विद्यार्थी म्हणून , तुमच्या शाळेची बस वेळेवर येत नसल्याची तक्रार , बस संचालकास करणारे पत्र लिहा

**<u>किंवा</u>**

* तुमच्या स्पोर्ट्स अकॅडमी साठी खेळाच्या साहित्याची मागणी करणारे पत्र दुकानदारास लिहा.